| | | |
|---|---|---|
| | **पोलीस आयुक्तालय**<br>**मिरा-भाईंदर, वसई-विरार**<br>**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**<br>**फोन नं. ०२२-२९४५१००१** | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |

# ‘मे महिन्यातील गुन्हयाची उत्कृष्ट उकल’ म्हणून पोलीस अधिकारी/अंमलदारांचा मा. पोलीस आयुक्त यांनी केला सत्कार.

वसई, विरार, नालासोपारा या परिसरामध्ये मागील काहि दिवसांमध्ये घरफोडी करुन चोरी करण्याचे प्रमाण खुप वाढल्याने वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी सदर प्रकारच्या गुन्हयांना आळा घालून घडलेले गुन्हे उघडकीस आणण्याबाबत सतर्क सुचना दिलेल्या होत्या. त्याअनुषंगाने पोलीस स्टेशन व गुन्हे शाखेतील अधिकारी/अंलमदार यांनी आपआपले गुप्त बातमीदारांना सदरबाबत अवगत करुन घरफोडीचे गुन्हे करणाऱ्या बऱ्याच संशईतांबाबत माहिती प्राप्त करुन शोध चालू केला होता. सदर प्रकारच्या घरफोडी करणाऱ्या आरोपीतांचा शोध घेत असतांना माणिकपुर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि नं ७८/२०२२ भादंविस कलम ४५४, ४५७, ३८० प्रमाणे दाखल गुन्हयातील संशईताबाबत गुन्हे शाखा, युनिट-२ च्या पोलीस अधिकारी/अंमलदार यांना गुप्त बातमीदाराकडून माहीती मिळाल्याने त्याची खात्री करण्याकरिता तांत्रीक गोष्टींच्या आधारे अधिक माहिती गोळा केल्यानंतर दिनांक २१/०४/२०२२ रोजी गुन्हे शाखा युनिट-२ च्या अधिकारी/अंमलदार यांनी घरफोडी करणाऱ्या संशईतांबाबत खात्री झाल्याने सापळा रचुन आरोपी नामे १) हनुमंत उर्फ अजय उर्फ अपलु चिन्नप्पा धोत्रे वय ३८ वर्ष रा. रुप कला स्टुडीओच्या बाजुला, वडारा पाडा, काजुपाडा, बोरीवली पुर्व यास ताब्यात घेतले होते. प्राथमिक चौकशीदरम्यान आरोपीने त्याचे साथीदार २) रफीक हनिफ शेख उर्फ चिक्या वय २३ वर्षे रा. यादव नगर साई चाळ रुम नं ६ बोईसर जि. पालघर ३) सुलतान समीर शेख वय-२५ वर्षे रा-भोलानगर झोपडपटटी, भाईंदर प. जि. ठाणे यांचेसोबत सदरील घरफोडी व इतर गुन्हे केल्याची माहिती दिल्याने त्यांना अटक करण्यात आली. आरोपींच्या अटकेदरम्यान तपासी अधिकारी व पथकातील अंमलदार यांनी अटक आरोपींकडे कौशल्यपुर्वक सखोल विचारपुस केली असता त्यांनी माणिकपुर, आचोळे, वालीव, विरार, मांडवी व तुळींज पोलीस ठाणे हद्दीमध्ये घरफोडीचे व वाहन चोरीचे तब्बल १८ गुन्हे केल्याची माहिती दिली. त्यापैकी १४ घरफोडीचे व ४ वाहनचोरीचे गुन्हे असून सदर तपासादरम्यान आरोपीतांकडून **२१२ ग्रॅम सोने, १ किलो ४७८ ग्रॅम चांदी, ५ मोटार सायकली आणि १ मोबाईल असा एकुण १३,१८,०००/- रुपये** किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

अटक आरोपीतांपैकी आरोपी नामे रफीक हनिफ शेख उर्फ चिक्या हा विरार पोलीस ठाणेकडील दाखल ८ गुन्हयामधील पाहिजे आरोपी होता त्यामुळे विरार पोलीस ठाणेकडील घरफोडी व वाहन चोरीचे सदरील ८ गुन्हयांमध्ये त्याचेविरुध्द मा. न्यायालयात दोषारोप सादर करुन गुन्हयांची निर्गती करण्यात येणार आहे. आरोपींनी कबुली देवून गुन्हयातील चोरी केलेला मुद्देमाल काढून दिल्याने जप्त करण्यात आला असून सदरील गुन्हे खालीलप्रमाणे आहे.

| अं.नं. | घरफोडी व वाहन चोरीचे गुन्हे |
|---|---|
| १. | आचोळा पो स्टे गु रजी नं. ४२/२०२२ भादविस कलम ४५७,३८० प्रमाणे |
| २. | आचोळे पोस्टे गु रजि नं ०५/२०२२ भादविस कलम ४५४, ३८० प्रमाणे |
| ३. | आचोळे पोस्टे गु रजि नं १५४/२०२२ भादविस कलम ३८० प्रमाणे |
| ४. | तुळींज पो स्टे गु रजी नं. ११९/२०२२ भादविस कलम ४५७,३८० प्रमाणे |
| ५. | तुळींज पो स्टे गु रजी नं. ९०/२०२२ भादविस कलम ४५४,४५७,३८० प्रमाणे |
| ६. | माणीकपुर पो स्टे गु रजी नं. ७८/२०२२ भादविस कलम ४५४,३८० प्रमाणे |
| ७. | माणीकपुर पो स्टे गु रजी नं. १७०/२०२२ भादविस कलम ४५४,३८० प्रमाणे |
| ८. | माणीकपुर पो स्टे गु रजी नं.१२२/२०२२ भादविस कलम ४५४,४५७,३८० प्रमाणे |
| ९. | वालीव पो स्टे गु रजी नं. ४५९/२०२२ भादविस कलम ४५४,४५७,३८० प्रमाणे |
| १०. | वालीव पो स्टे गु रजी नं.४९१/२०२२ भादविस कलम ४५४,४५७,३८० प्रमाणे |
| ११. | वालीव पो स्टे गु रजी नं. ४२२/२०२२ भादविस कलम ४५७,३८० प्रमाणे |
| १२. | वालीव पो स्टे गु रजी नं. २४०/२०२२ भादविस कलम ४५७,३८० प्रमाणे |
| १३. | विरार पो स्टे गु रजी नं.३५७/२०२२ भादविस कलम ४५४,४५७,३८० प्रमाणे |
| १४. | विरार पो स्टे गु रजी नं. ५११/२०२२ भादविस कलम ४५७,३८० प्रमाणे |
| १५. | वालीव पो स्टे गु रजी नं. ४६३/२०२२ भादविस कलम ३७९ प्रमाणे |
| १६. | वालीव पो स्टे गु रजी नं. ४४८/२०२२ भादविस कलम ३७९ प्रमाणे |
| १७. | वालीव पो स्टे गु रजी नं. ४४४/२०२२ भादविस कलम ३७९ प्रमाणे |
| १८. | मांडवी पो स्टे गु रजी नं. ६/२०२२ भादविस कलम ३७९ प्रमाणे |

सदर गुन्हयाचे तपासामध्ये कामगिरी करणारे गुन्हे शाखा-२ वसई युनीटचे पोलीस निरीक्षक श्री शाहुराज रणवरे, सपोनिरी/ सुहास कांबळे, सपोनिरी/सागर शिंदे, सहाफौज/ रमेश भोसले, पो.हवा. मंगेश चव्हाण, संजय नवले, महेश पागधरे, चंदन मोरे, सचिन पाटील, प्रशांत पाटील, जगदीश गोवारी, पोना. प्रशांतकुमार ठाकुर, रमेश आलदर, पो.कॉ. अमोल कोरे, दादा आडके, सुधीर नरळे यांचा दिनांक ११/०६/२०२२ रोजी मा. श्री. सदानंद दाते, पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर,वसई-विरार यांनी मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **'मे महिन्यातील गुन्हयाची उत्कृष्ट उकल'** म्हणुन प्रशस्तीपत्र व बक्षिस देवून सत्कार केला आहे.



दिनांक ४/५/२०२२ रोजी वालीव पोलीस ठाणे हद्दीमध्ये एका ५० वर्षीय नायजेरियन नागरिकाचा त्याचेच ६ सहकाऱ्यांनी खून केल्याने वालीव पोलीस ठाणे येथे ४८१/२०२२ भादंवि कलम ३०२, ३६४, ३२३, १४३, १४७, १४९ प्रमाणे दिनांक ५/५/२०२२ रोजी दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयातील आरोपी सर्व हे नायजेरियन नागरिक असल्याचे व ते भारत देश सोडून पळून जाण्याच्या तयारीत असल्याचे माहिती मिळाल्याने वालील पोलीस ठाण्याचे तपास पथकाने मेघालय राज्यातील वरिष्ठ पोलीस अधिकारी यांचेशी संपर्क साधून मदत प्राप्त केली व सदर गुन्हयातील ६ आरोपीतांना दिनांक ६/५/२०२२ रोजी ताब्यात घेवून आरोपीतांना अटक केली. सदरील कामगिरीबाबत मा. पोलीस आयुक्त यांनी वालीव पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री कैलास बर्वे, पोनि. राहूलकुमार पाटील, सपोनि. संतोष सांगवीकर, सपोनि. ज्ञानेश फडतरे, पोहवा. मनोज मोरे, मुकेश पवार, किरण म्हात्रे, सचिन दोरकर, राजेंद्र फड, गांगुर्डे, गरीबे, मुंडे, खताळ यांचा मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये ‘मे महिन्यातील गुन्हयाची उत्कृष्ट उकल क्रमांक-२’ म्हणुन प्रशस्तीपत्र व बक्षिस देवून सत्कार केला आहे.



त्याचप्रमाणे वाढलेल्या वाहनचोरीच्या गुन्हयाचे प्रमाण कमी करण्याचे दृष्टीने वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे पेल्हार पोलीस स्टेशनच्या पोलीस अधिकारी/अंमलदार यांनी वाहन संशईतांबाबत माहिती प्राप्त करुन व तांत्रीक पुराव्याच्या आधारे

संशईत नामे १) रोहितकुमार गौड, वय-२१ वर्षे, २) विनयकुमार पटेल, वय-१९ वर्षे, ३) सौरभ यादव, वय-२२ वर्षे, ४) रितेश जंजाळे, वय-१९ वर्षे, सर्व रा. वसई (पु.), ता. वसई, जि. पालघर यांना दिनांक ३०/०५/२०२२ रोजी अटक करुन त्यांचेकडून **एक ऑटो रिक्षा व ०७ मोटार सायकल असा एकुण- २,२५,०००/- रुपये** किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करुन ८ गुन्हे उघडकीस आणल्याने पेल्हार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. विलास चौगुले, पोउपनि/सनिल पाटील, पोहवा/योगेश देशमुख, तानाजी चव्हाण, पोना/प्रताप पाचुंदे, पोअं/संदिप शेळके, मोहसिन दिवाण, सचिन बळीद, बालाजी गायकवाड, किरण आव्हाड, रोशन पुरकर यांचा मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये 'मे महिन्यातील गुन्हयाची उत्कृष्ट उकल क्रमांक-३' म्हणुन प्रशस्तीपत्र व बक्षिस देवून सत्कार केला आहे.



---ooo---